डीजीआयपीआर/२०२४-२५/५८८२

मुख्य कार्यकारी अधिकारी,

# नगर परिषद पुसद, जि. यवतमाळ

जा. क्र. नपपु/प्रशासन विभाग/११३/२०२५ दिनांकः २४/०१/२०२५

## जाहीर सूचना

"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"

"अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यांतर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६७ सेवाची यादी प्रसिध्द केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिध्द करुन नगर प्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवक हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सादर केल्यास नगर परिषद पुसद कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगर परिषद तर्फे जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागने विविध शासन निणर्याद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी पुसद नगर परिषदच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**अभिजित वायकोस**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, पुसद**